# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०१७ / श्रावण ६, १९३९ ( शके )

(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री
(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री
(३) पर्यावरण मंत्री
(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

} यांचे प्रभारी विभाग

---

प्रश्नांची एकूण संख्या - ४३

---

### राज्यात हृदयरोग शस्त्रक्रीयेसाठी वापरल्या जाणा-या सामुग्रीचा पुनर्वापर करुन तसेच मोतीबिंदू व तत्सम शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या लेन्सची जास्त किंमत आकारुन रुग्णांची फसवणूक होत असल्याबाबत

(१) * ८४९०५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख

**(लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील फोर्टीज, हिरानंदानी हेल्थ केअर प्रा. लि., ज्युपिटर प्लॅटिनम मुलुंड, बीएईएस अंधेरी, कमल नयन बजाज औरंगाबाद, सहयाद्री पुणे, वोखहार्ट नागपूरसह राज्यातील अन्य रुग्णालयात कॅथेटर खरेदी व रुग्णांना दिलेल्या देयकांची अन्न व औषध प्रशासनाने तपासणी केली असता हृदयरोगावरील शस्त्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या कॅथेटर व इतर सामुग्रीचा पुनर्वापर करुन रुग्णांची आर्थिक फसवणूक करण्यात येत असल्याचे दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मोतीबिंदु वा तत्सम शस्त्रक्रियेसाठी वापरल्या जाणा-या विविध कंपनीच्या लेन्सच्या मूळ किमंतीच्या तब्बल २० टक्क्यापर्यंत अधिक शुल्क आकारुन विक्रेते व रूग्णालयाकडून रूग्णांची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब माहे जून २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबधीत दोषी विरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच राज्यात सदर प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाव्दारे मार्च, २०१७ ते मे, २०१७ या कालावधीत राज्यातील प्रमुख ०८ रूग्णालयांची व त्यांच्या औषध भांडाराची तपासणी करण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या ०८ रूग्णांलयांपैकी ०७ रूग्णालयात अँजिओप्लास्टी या प्रक्रियेसाठी वापरण्यात येत असलेल्या कॅथेटरचे निर्जन्तुकिकरण करून त्याचा पुर्नवापर रूग्णाला कल्पना न देता करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.सदर रूग्णालये त्यासाठी शुल्कदेखील आकारत असल्याचेही तपासणीदरम्यान निदर्शनास आले.

(२) अन्न व औषध प्रशासनाने मोतीबिंदु वा तत्सम शस्त्रक्रियेसाठी वापरल्या जाणा-या विविध कंपनीच्या लेन्सच्या किमंतीबाबत चौकशी केली असता कुठेही MRP पेक्षा जास्त किंमत आकारल्याचे आढळून आलेले नाही.

तथापि रूग्णालयास व पुरवठादारांना आकारण्यात येणा-या किमती MRP पेक्षा खूप कमी असल्याचे आढळले. रूग्णालयास व पुरवठादारांना आकारण्यात येणा-या किमती व MRP मध्ये २०० ते ३०० टक्के तफावत आढळली.

(३) व (४) अन्न व औषध प्रशासनाने याबाबत चौकशी केली आहे. इन्ट्राऑक्युलर लेन्स या मेडीकल डिव्हायसेसचा समावेश औषधाच्या व्याख्येत सन २००५ च्या अधिसुचनेनुसार करण्यात आला आहे. मात्र सदर डिव्हायसेसच्या किमतीवर सध्या नियंत्रण नसल्याने व कुठेही MRP पेक्षा जास्त किंमत आकारल्याचे आढळून आलेले नसल्याने प्रशासनाकडून कारवाई करण्यात आलेली नाही.

प्रश्न भाग-१ मधील रूग्णालयांविरूध्द अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील औषधे आणि अन्नधान्यांतील होणारी भेसळ रोखण्याबाबत**

**(२) * ८४८३७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११ कोटीहून अधिक जनतेची औषध सुरक्षा फक्त १०० औषध निरीक्षकांवर अवलंबून असून त्यापैकी केवळ ८७ अन्न निरीक्षक कार्यरत असल्याचे तसेच अन्न व औषध प्रशासन विभागात गट 'अ' ते गट 'ड' संवर्गातील ११७६ पदे मंजूर असून यातील ४०७ पदे रिक्त असल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न भेसळ प्रतिबंधात्मक कायद्यानुसार चाचणी अहवाल प्रयोगशाळेने १४ दिवसांत पाठविणे बंधनकारक असताना अन्न व औषध प्रशासनाच्या मुंबई येथील प्रयोगशाळेतील अपु-या कर्मचाऱ्यांमुळे मुंबई ठाण्यासह बाहेरुनही पाठविलेल्या अन्न पदार्थांच्या नमुन्यांच्या चाचणीसाठी किमान दोन ते तीन महिन्यांची प्रतिक्षा करावी लागत असल्यामुळे भेसळ रोखणे शक्य होत नसल्याचे तसेच मोठया प्रमाणात तक्रारी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील औषधे आणि अन्नधान्यांतील होणारी भेसळ रोखण्यासाठी व अन्न पदार्थाच्या चाचण्यांच्या नमुन्यांचे अहवाल तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तसेच रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनामध्ये एकूण ११७६ मंजूर पदे असून यापैकी ४०९ पदे रिक्त आहेत. तसेच औषध निरिक्षकांच्या १६१ मंजूर पदांपैकी १०० पदे भरली आहेत व अन्न सुरक्षा अधिकारी संवर्गातील २६५ मंजूर पदांपैकी १७८ पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) अन्न व सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ अतंर्गत घेण्यात आलेले नमुने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील व अन्न सुरक्षा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या ८ प्रयोगशाळांमध्ये पाठविण्यात येत आहेत. तसेच प्रयोगशाळेंमध्ये प्राप्त औषध व अन्न नमुन्यातील चाचणीची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने व त्वरेने विश्लेषण करता यावे याकरिता अत्याधुनिक उपकरणे खरेदी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे प्रशासनाच्या अन्न चाचणी प्रयोगशाळेच्या बळकटीकरणाकरिता केंद्र शासनाचे अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरणाद्वारे सुमारे ०८ कोटी रुपयांची आत्याधुनिक उपकरणे खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहेत.

अन्न व औषध प्रशासनातील प्रयोगशाळांसह सर्वच पदाचा आढावा घेऊन पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करून घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अभ्यासक्रम सीबीएसईच्या धर्तीवर करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(३) * ८५०७० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सीबीएसई व आयसीएससी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेने राज्याचा अभ्यासक्रम सोपा असल्याने एनईईटी व आयआयटी सारख्या परिक्षेत

राज्यातील विद्यार्थी मागे राहत असल्याने मा.शिक्षणमंत्री यांनी राज्यातील अभ्यासक्रम सीबीएसईच्या धर्तीवर करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, अभ्यासक्रम बदलून शाळा सुरू होवूनही अद्याप नवीन अभ्यासक्रमाचे पुस्तक उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार अभ्यासक्रमाचे पाठयपुस्तक उपलब्ध करून देण्याबाबत व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाला जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यातील विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना केंद्रीय पातळीवर होणा-या परीक्षांमध्ये स्पर्धा करण्याच्या दृष्टीने इ. ११ वी व इ. १२ वी विज्ञान शाखेचा अभ्यासक्रम व मूल्यमापनात आवश्यक बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यानुसार राज्य मंडळातर्फे पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भासह राज्यातील अनेक शाळांना सीबीएसई आणि शिक्षणाधिका-यांची मान्यता नसतांनाही विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असल्याबाबत**

**(४) * ८४८९७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड),**

**श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील बहुसंख्य इंगजी माध्यमांच्या शाळांना केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) किंवा भारतीय माध्यमिक शिक्षण प्रमाणपत्र (आयसीएसई) ची मान्यता तसेच शिक्षणाधिका-यांचे ना हरकत प्रमाणपत्र नसतांनाही विद्यार्थ्यांना नर्सरीपासून सातवीपर्यंत प्रवेश दिला जात असून याकडे शिक्षणाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याची बाब दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक मिळून ६०० पेक्षा अधिक शाळा मान्यतेविना सुरु असल्याचे शिक्षण विभागाने माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जाहीर केले असून, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या भागातील शिक्षण उपसंचालक तसेच पालिका शिक्षण अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय प्राथमिक व माध्यमिक अशा एकूण ३१८ अनधिकृत शाळांची नावे जाहिर करण्यात आली असून त्यापैकी ठाणे जिल्हयात सर्वाधिक १२९ शाळा, मुंबईत ११३ शाळा असून कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात ५ इंग्रजी व १ हिंदी माध्यमाची शाळा अनधिकृत असल्याचे तसेच पुणे जिल्हा परिषदेने या अनुषंगाने जाहीर केलेल्या यादीत पुण्यामध्ये ४१ शाळा नियमबाहय असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत शाळांमध्ये पालकांनी विद्यार्थ्यांचा प्रवेश घेऊ नये असे जाहिर केले असले तरी ही संस्थाचालकांच्या खोटया जाहिराती, आश्वासने व पालकांचे अज्ञान यामुळे परवानगी नसलेल्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देवून विद्यार्थ्यांसह पालकांची फसवणूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनधिकृत शाळांमध्ये मराठी व इंग्रजी माध्यमांच्या एकूण किती शाळांचा समावेश आहे व याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई केली आहे तसेच उक्त शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.
बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या दि. ३ डिसेंबर, २०१२ च्या अधिसुचनेनुसार अनधिकृत शाळेवर कारवाई करण्याबाबत सक्षम प्राधिका-यांना प्राधिकृत केले आहे. अनधिकृत शाळेत प्रवेश घेऊ नये यासाठी अनधिकृत शाळांची यादी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात येते. तसेच अनधिकृत शाळेवर तात्काळ कारवाई करण्याचे निदेश सर्व शिक्षण निरीक्षक/ शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहेत. अनधिकृत शाळा बंद झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे नजिकच्या मान्यताप्राप्त शाळेत समायोजन करण्यात येते.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराचे अवैध कंत्राट रद्द करुन नवीन निविदा प्रसिध्द करणेबाबत

**(५) * ८७०५३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराचे अवैध कंत्राट रद्द करून तात्काळ नवीन निविदा प्रसिध्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात माध्यमिक व प्राथमिक शाळांमध्ये शालेय पोषण आहार साहित्य पुरविणेसाठी गत दिड वर्षे निविदा प्रकिया पुर्ण होवूनही निर्णय झाला नसल्याने एम.डी.भूतडा ट्रेडर्स यांनी निविदा प्रकियेतील अट अवैधरित्या शिथिल करून निविदा मिळविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने भूतडा ट्रेडर्स यांना दिलेली निविदा प्रकिया रद्द करून जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचेमार्फत नवीन निविदा प्रकिया तात्काळ प्रसिध्द करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार निविदा अंतिम करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.६८६९/२०१७ दाखल झाली असून, सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

**फागणे (जि.धुळे) गावाचा मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करण्याबाबत**

**(६) * ८५६१० श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फागणे (जि.धुळे) येथील नागरिकांना गत २ वर्षापासून भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असून गावांतर्गत असलेली पाईपलाईन ४० वर्षे जुनी असल्यामुळे जागोजागी पाण्याची गळती होत असून पाण्याची टाकीही कालबाहय झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी फागणे गावाचा मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करण्यात यावा, अशी येथील नागरिकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) होय.

(३) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमामध्ये मौ. फ़ागणे गावाचा समावेश करण्यात आला असून, त्याकरिता रु.९०.०० लक्ष इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, धुळे यांना योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास मान्यतेसाठी सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या विद्यापीठांच्या विभाजनाबाबत

**(७) * ८५७५२ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढती महाविद्यालयांची व विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता सध्याच्या विद्यापीठांच्या यंत्रणा अपुऱ्या पडत असून, परिक्षेतील गोंधळ, निकाल लावण्यास होणारा अक्षम्य विलंब, गैरव्यवस्थापन इ. मुळे त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यातील सर्वच विद्यापीठांचे विभाजन करुन शंभर ते दिडशे महाविद्यालयांसाठी एक याप्रमाणे लहान-लहान विद्यापीठे स्थापन करण्याचा किंवा प्रत्येक जिल्हयात विद्यापीठांची उपकेंद्रे स्थापन करण्याबाबतचा निर्णय शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या विद्यापीठ विभाजन करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) खरे नाही.

(२) राज्यातील अकृषि विद्यापीठांतर्गत उपकेंद्र निर्मिती संदर्भात एक समान धोरण निश्चित करण्यासाठी दि. २८.०४.२०१५ च्या शासननिर्णयान्वये माजी प्र.कुलगुरु डॉ. योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास दि.२३.०२.२०१६ रोजी सादर केला आहे.

(३) व (४) संदर्भात, डॉ.योगानंद काळे समितीने प्रामुख्याने स्थानिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, संशोधनात्मक विस्तारीत सेवा, प्रशासकीय प्रमाणता, उपकेंद्रासाठी पायाभुत सुविधांचा विकास आर्थिक स्त्रोताचे नियोजन पदरचना इत्यादी बाबी संदर्भात समितीने शिफारशी केल्या असून समितीने केलेल्या शिफारशींची व्यवहार्यता तपासून अकृषि विद्यापीठांतर्गत उपकेंद्र स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेण्याचे शासनाच्या विचारधीन आहे.

-----------------

## नगरधन (ता.रामटेक, जि.नागपूर) ग्राम पंचायतीने अनुदानित शौचालय वाटपामध्ये झालेला गैरव्यवहार

**(८) * ८६१२५ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरधन (ता.रामटेक, जि.नागपूर) ग्रामपंचायतीमध्ये १८९ लाभार्थ्यांनी राज्य शासनाकडून शौचालयाकरीता दिल्या जाणाऱ्या १२००० रूपयांच्या अनुदानात गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीमध्ये २१५ पेक्षा जास्त ग्रामस्थांकडे शौचालय नसल्याने त्यांनी ग्रामपंचायतीमध्ये अर्ज दाखल केला असून या लाभार्थ्यांना शौचालयाच्या लाभापासून वंचीत ठेवण्यात येऊन त्याचा लाभ गावातील श्रीमंत वर्गातील व्यक्तींना देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मा. पालकमंत्र्यानी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देऊनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त ग्रामपंचायतीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) यासंदर्भात दिनांक १३.४.२०१७ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.
(२), (३) व (४) मा. पालक मंत्री ,नागपूर जिल्हा यांनी दिलेल्या निर्देशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांच्या दिनांक १५.४.२०१७च्या आदेशान्वये चौकशी समितीद्वारे चौकशी केली. चौकशी अहवालानुसार सचिव, ग्रामपंचायत नगरधन यांच्यावर शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरू करण्यात आली असून अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वांद्रे येथील शासकीय तंत्रनिकेतनच्या जे.जे वसतिगृहाच्या खोलीतील छत कोसळल्याबाबत**

**(९) * ८५५७७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय तंत्रनिकेतन, वांद्रे, मुंबई येथील सन १९६८ साली बांधण्यात आलेल्या जेजे वसतीगृहाची जवळपास ४० वर्ष दुरूस्ती करण्यात आली नसून

पुरेशा देखभाल-दुरुस्ती अभावी सदर वसतिगृहाच्या एका खोलीतील छत दिनांक ९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास कोसळून झालेल्या दुर्घटनेत एक विद्यार्थी जखमी झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-१७ मध्येही एका विद्यार्थ्यांवर व शिक्षकांवर स्लॅब पडल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटना घडण्यापूर्वी युवा सेनेने सदरहू वसतीगृहाची दुरावस्था झाल्याबाबत तंत्रनिकेतनात आंदोलन करून प्राचार्यांना निवेदन दिले आहे तसेच तंत्र शिक्षण संचालक यांच्याकडे अनेकवेळा तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच या वसतिगृहामध्ये शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई आणि जे.जे.आर्किटेक्ट कॉलेजचे विद्यार्थी राहत असून विद्यार्थ्यांकरीता पुरेशा मुलभूत सोयी-सुविधाही उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार गरजू विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या दृष्टीने जे.जे.वसतिगृह सुसज्ज करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दिनांक ९/०४/२०१७ रोजी पहाटे वसतीगृहाच्या एका खोलीतील छताच्या प्लास्टरचा तुकडा पडला असून त्यामध्ये एका विद्यार्थ्यास किरकोळ जखम झाली होती .

(२) नाही.

(३) नाही.

(४) या वसतिगृहामध्ये शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई या संस्थेतील विद्यार्थी राहत असून त्यांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

(५) सदर वसतीगृहातील इमारतीच्या मजबूतीकरणाचे व दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याबाबत शासकीय तंत्रनिकेतन मुंबई या संस्थेने दिनांक १०/०४/२०१७ व दिनांक २७/०६/२०१७ रोजीचे पत्रांन्वये अधिक्षक अभियंता, सा.बां.वि. यांना कळविलेले आहे.

-----------------

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे क्रीडा संकूल उभारण्याबाबत**

**(१०) * ८८९७९ श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) शहराची हद्दवाढ न झाल्याने तेथे क्रीडा संकूल उभारण्यात आले नसल्यामुळे खेळाडूंची व व्यायाम करणा-या तरुण तरुणींची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराची हद्दवाढ शासनाने करण्याबाबत तसेच सांगोला, पाटखळ, खोमनाळ किंवा मरवडे या रस्त्यांच्या आसपासची जागा आरक्षित करुन क्रीडासंकूल उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) मंगळवेढा तालुका क्रीडा संकुलाचे उभारणीचे काम सुरु आहे. त्यामुळे नवीन जागेची अथवा वाढीची आवश्यकता नाही. सदर क्रीडा संकुल बांधकामासाठी टप्प्याटप्प्याने रु.१००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेले आहे. सदर निधीतून २०० मी. धावनपथ, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल या क्रीडा सुविधा पुर्ण झालेले आहे. सदर कामावर रु.१६.०० लक्ष खर्च करण्यात आला आहे. सदर संकुलाचा वापर चालु आहे. त्यामुळे मंगळवेढा शहराची हद्दवाढ हा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**सावंतवाडी (जि.सिंधूदूर्ग) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत**

**(११) * ८७७३६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजगांव (ता.सावंतवाडी, जि.सिंधूदूर्ग) येथील जीवन प्राधिकरण विभागाने दीड कोटी रुपये खर्च करुन उभारलेली नळ पाणी पुरवठा योजना सद्यःस्थितीत बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तालुक्यात पाणी टंचाई निर्माण झाली असल्याने पाणी टंचाई निवारणार्थ ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून जिल्हाधिका-यांना ५१ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील गावांमध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई दूर होण्यासाठी पंचायत समितीने सुचविलेल्या कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी प्रलंबित ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास जिल्ह्यातील तालुका निहाय गावे व वाड्यांमधील पाणी टंचाई निवारणार्थ किती प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे तसेच उक्त ठिकाणांची तीव्र पाणी टंचाई दूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) सावंतवाडी तालुक्यातील सन २०१६-१७ च्या पाणी टंचाई कृती आराखडयातील २५ प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणेत आले.

(३) व (४) हे खरे नाही.

सावंतवाडी तालुक्यातील नळ योजना विशेष दुरुस्ती करणे-६, विंधन विहिरी घेणे-१०, विंधन विहिरी दुरुस्त करणे-६, विहीर खोल करणे गाळ काढणे-३ अशा एकूण -२५ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

तसेच माजगांव गावातील ६ वाडयांमध्ये विंधन विहीर विशेष दुरुस्तीची ६ कामे मंजूर आहेत. गावामध्ये सद्यस्थितीत पाणी टंचाई नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे दुधा (जि. बुलडाणा) या गावातील जलस्वराज्य योजने अंतर्गत बंद पडलेली पाणीपुरवठा योजना सुरु करणेबाबत

**(१२) * ८६९९५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दुधा (जि. बुलडाणा) या गावाकरीता दोन वर्षापूर्वी जलस्वराज्य पाणीपुरवठा योजनेअंतर्गत ढालसावंगी तलावातून पाणी पुरवठा सुरू होऊन

संबंधीत ग्रामस्थांना साधारण वर्षभर पाण्याचा लाभ मिळाला तदनंतर उक्त योजना बंद पडल्याने गावात पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त योजना सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मौजे दुधा (ता.जि. बुलडाणा) येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली असून, सदर योजनेतून मे, २०१४ पासून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तथापि, मे, २०१७ मध्ये वीज पुरवठयात तांत्रिक बिघाडामुळे १ महिना योजनेचा पाणी पुरवठा बंद होता. सदर कालावधीत गावात जुन्या अस्तित्वातील बोअरवरुन पाणी पुरवठा करण्यात आला आहे. वीज पुरवठा सुरळीत झाल्यानंतर योजनेचा पाणी पुरवठा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरपना (जि. चंद्रपूर) तालुक्यातील गडचांदूर शिवारातील माणिकगढ कंपनीच्या रसायनयुक्त धुरामुळे परिसरात होणारे प्रदूषण

**(१३) * ८९८५९ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपना (जि. चंद्रपूर) तालुक्यातील गडचांदूर शिवारातील माणिकगढ कंपनीच्या रासायनिक धुरामुळे परिसरातील नागरिकांना फुप्फूस, दमा व श्वासाच्या जिवघेण्या आजाराच्या घटनांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) तसेच, सदर धुरामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी नापीक झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळाच्या अधिकारी व प्रकल्प संचालकाच्या सगनमताने सदर प्रकरणाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) वर्ष २०१६-१७ मध्ये विचाराधीन तालुक्यात श्वसनसंस्थेशी संबंधीत आजारी रुग्णांची संख्या वाढली हे खरे आहे, तथापि, सदर आजार प्रदूषणामुळे झाल्याचे निश्चित सांगता येणार नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) उद्योगातील धुरांडयातून बाहेर पडणाऱ्या हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी संबंधित उद्योगाने धुरांडयांना नियमित धुरांडे तपासणी (Continuous Stack monitoring) यंत्रणा बसविल्या असून त्या कार्यरत आहेत. तसेच उद्योगाच्या परिसरातील / वातावरणातील हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी एकूण तीन वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनानुसार स्वंयचलीत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी संयंत्रणा (Continuous Ambient Air Quality monitoring station) उभारण्यात आली असून ते देखील कार्यरत आहे. या व्यतिरिक्त मंडळातर्फे वेळोवेळी धुरांडयातून बाहेर पडणाऱ्या हवेची तसेच परिसरातील / वातावरणातील हवेची गुणवत्ता तपासली जाते. ती संमती पत्रातील विहित मर्यादित आहे. तसेच सर्व बाधित रुग्णांवर व्यवस्थित उपचार झाले आहेत. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चोपडा (जि. जळगांव) तालुक्यामध्ये क्षारयुक्त दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(१४) * ९१५१३ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि. जळगांव) येथे क्षारयुक्त दुषित पाणी पुरवठा होत असल्याने आर.ओ.सिस्टीम बसविण्यासाठी निधी उपलब्ध होण्याकरिता स्थानिक

लोकप्रतिनिधिंनी दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, धानोरा, गोरगावले बु.वढोदा, सनपुले, गोरगावले खुर्द, कोळंबा, कठोरा, कुरवेल, किनगांव, बु ता. यावल, किनगांव खुर्द, न्हावी, दहिगांव आदि गांवाना दुषित पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांना किडनीचे विकार उदभवत असून नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावात स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा याकरिता आर ओ सिस्टीम बसविण्याबाबत तात्काळ निधी उपलब्ध करणेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जळगांव यांचे मार्फत पिण्याच्या पाण्याची रासायनिक तपासणी अभियान राबविले असता, सदर अभियानात नमूद गावांमध्ये नायट्रेटचे प्रमाण आढळून आले असल्याचा अहवाल संबधित प्रयोगशाळेने सादर केलेला आहे. आरोग्य विभागाकडून केलेल्या सर्वेक्षणानुसार सदर गावांमध्ये किडनीचे विकार उद्भवलेले नाहीत.
(३) आर. ओ. प्रणाली ५०० लिटर/ताशी ते ४००० लिटर/ताशी या सन २०१६-१७ च्या किमान दरास जिल्हा परिषदेमार्फत मंजूरी देण्यात आली असून, ग्रामपंचायतीस १४ व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतून आर. ओ. प्रणाली घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील पनवेलजवळील तळोजा व कामोठे औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमूळे होणारे प्रदूषण

**(१५) * ८९४१२ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील पनवेलजवळील तळोजा औद्योगिक वसाहतीतील ग्लोबल मरीन (एक्सपोर्ट) कंपनीतील प्रदुषणाने परिसरातील नागरिकांचे आरोग्य

धोक्यात आल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारखाना १५ दिवसांत बंद करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळोजा व कामोठे येथील कारखान्यांच्या प्रदूषणामुळे राज्य पर्यावरण मंडळाने प्रदूषण करणाऱ्या कंपन्या व कारखान्यांचा ४० टक्के पाणी कपातीचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्णयाला डावलून उक्त परिसरातील कंपन्यांनी विघातक व विषारी पाणी व वायू यावर कोणतीच उपाययोजना केलेली नसल्याने येथील औद्योगिक परिसरातील कारखान्यांतील विषारी वायू व पाण्यामुळे प्रदुषण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दि. २४/०५/२०१७ रोजीच्या बंद आदेशान्वये आजमितीस सदरहू कंपनी बंद आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तळोजा औद्योगिक वसाहतीतील सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेची कार्यप्रणाली सुधारण्यासाठी केवळ सदर औद्योगिक वसाहतीतील औद्योगिक घटकांच्या पाणी पुरवठयामध्ये ४०% कपातीचा निर्णय घेतला होता. कामोठे येथील उद्योगांबाबत ४०% पाणी कपातीचा कोणताही निर्णय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत घेण्यात आलेला नाही.

(४) हे खरे नाही.

(५) तळोजा औद्यागिक वसाहतीतील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या समंतिपत्राच्या मानकांचे उल्लंघन करणाऱ्या ६३ उद्योगांच्या पाणी पुरवठयामध्ये आजतागायत ४०% कपात करण्यात आली आहे.

-----------------

## पुणे जिल्ह्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत ग्रंथालय अनुदानातून पुस्तक खरेदीमध्ये झालेली अनियमितता

**(१६) * ८८७१२ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमातून ग्रंथालय अनुदानाचे एकूण ३ लाख ६१ हजार ९०० रुपये खेड पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील सर्व शिक्षा अभियान विभागाकडे जमा करून तालुक्यातील १५४ शाळांच्या खात्यावर प्रत्येकी २३५० रुपये याप्रमाणे दिनांक ५ ऑक्टोबर २०१६ रोजी वा त्यासुमारास वर्ग करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळांनी शालेय व्यवस्थापन समितीसमोर विषय मंजूर करून खरेदी करावी असे बंधनकारक असतानाही जिल्हा परिषदेतील तसेच पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी खाजगी प्रकाशकांना हाताशी धरून परस्पर प्रकाशकाकडून पुस्तकांचे संच खरेदी करण्यास शिक्षकांना सक्तीने भाग पाडल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रंथालय अनुदानातील पुस्तक खरेदीतील अनियमितता व गैरव्यवहार याची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे शहरात बर्फात होत असलेली भेसळ

**(१७) * ८६५५७ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजित पवार (बारामती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अमित**

**साटम (अंधेरी पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व नवी मुंबईत बेकायदा बर्फाचे उत्पादन वाढल्याचे निदर्शनास आल्याने अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ९ ते २१ मे २०१७ या कालावधीत २६ ठिकाणी छापे टाकून ७२ हजारांचा निकृष्ट दर्जाचा बर्फ नष्ट केल्याचे तसेच मुंबई व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हददीतील दूषित बर्फ विक्री करणाऱ्या दुकानांवर अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे विभाग पथकाने छापे घालून केलेल्या कारवाईत २६० किलो बर्फ नष्ट करण्यात आल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच भिवंडी (जि.ठाणे) कृष्णा कॉम्प्लेक्स येथील खाण्यासाठी अयोग्य असलेल्या बर्फाच्या आर जी आईस फॅक्टरीवर माहे जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान छापा टाकला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,मुंबई,नवी मुंबई व ठाणे शहरातील खाद्य पदार्थ व पेय पदार्थ विकणाऱ्या फेरीवाल्यांकडील ९५ टक्के बर्फामध्ये आरोग्यास धोकादायक असे ई-कोलाय असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार बर्फाची निर्मिती व विक्री करणा-यांवर कोणती कारवाई केली तसेच भेसळयुक्त बर्फाची विक्री होवू नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाव्दारे माहे मे व जून २०१७ मध्ये मुंबईत बर्फाचे एकूण २१ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येऊन एकूण ७३०८ किलो ग्रॅम बर्फाचा रू. १३९९६/- किमतीचा साठा जप्त करून नष्ट करण्यात आला. नवी मुंबईत बर्फाचे उत्पादन व विक्री करणा-या एकूण १८ आस्थापनांची तपासणी करण्यात आली.तेथून बर्फाचे एकूण ०२ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येऊन एकूण ३८५० किलो ग्रॅम बर्फाचा रू. १३२२८/- किमतीचा साठा जप्त करून नष्ट करण्यात आला. कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीत बर्फाचे उत्पादन व विक्री करणा-या एकूण १७ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तेथून

बर्फाचे एकूण ०४ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येऊन एकूण २६०० किलो ग्रॅम बर्फाचा रू. २६०००/- किमतीचा साठा जप्त करून नष्ट करण्यात आला.

(२) अन्न व औषध प्रशासनाव्दारे दि. ०६/०५/२०१७ रोजी खाण्यासाठी असलेल्या बर्फाचे उत्पादन करणा-या मे. आर जी आईस फॅक्टरी, कृष्णा कॉम्प्लेक्स, भिवंडी, ठाणे या पेढीची तपासणी करण्यात आली

(३) मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यातर्फे घेण्यात आलेल्या मोहिमेमध्ये मुंबई महानगरपालिकेला फेरीवाल्यांकडील ९५ टक्के बर्फामध्ये आरोग्यास धोकादायक असे ई-कोलाय जीवाणू असल्याचे निदर्शनास आले आहे अशा आशयाची बातमी दि. २९-०४-२०१७ रोजीच्या महाराष्ट्र टाईम वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(४) अन्न व औषध प्रशासनाव्दारे दि. ०६/०५/२०१७ रोजी मे. आर जी आईस फॅक्टरी, कृष्णा कॉम्प्लेक्स, भिवंडी, ठाणे या पेढीची तपासणी करण्यात आली. या पेढीतून १) बर्फ तयार करण्यासाठी उपयोगात येणारे पाणी व २) मानवी खाण्यासाठीच्या बर्फ या दोन अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेऊन सुमारे २९९६ किलो बर्फ नष्ट करण्यात आला. विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेल्या नमुन्यांचे अहवाल प्रतिक्षाधीन आहेत.

कोकण विभागात तपासणीसाठी घेण्यात आलेल्या ३१ नमुन्यांपैकी ०४ नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले असून त्यापैकी ०१ नमुने प्रमाणित तर ०१ नमूना असुरक्षित तर ०२ नमुने कमी दर्जाचे घोषित झाले आहेत. उर्वरीत २७ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

मुंबई विभागातील तपासणीसाठी घेण्यात आलेल्या २१ नमुन्यांपैकी ०३ नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले असून त्यापैकी ०२ नमुने प्रमाणित तर ०१ नमूना अप्रमाणित घोषित झाला आहे. उर्वरीत १८ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

कमी दर्जाच्या व असुरक्षित नमुन्यांप्रकरणी नियमानुसार कारवाई घेण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनाव्दारे भेसळयुक्त बर्फाची विक्री होऊ नये म्हणून उन्हाळ्याच्या दिवसात विशेष मोहीम राबविण्यात येते. बर्फाचा साठा आरोग्यास अपायकारक स्थितीत ठेवल्याचे आढळून आल्यास अथवा तो कमी दर्जाचा किंवा असुरक्षित घोषित झाल्यास त्यावर नियमानुसार कारवाई घेण्यात येते. .

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करा‍ड (जि. सातारा) तालुक्यात जैव कचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करण्याबाबत

**(१८) * ९००३९ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि. सातारा) तालुक्यातील उपजिल्हा व खाजगी रुग्णालयासाठी १०० बेड वा अधिक बेडची रचना असणाऱ्या रुग्णांलयासाठी जैव कचरा व्यवस्थापन प्रकल्प आवश्यक असून देखील अद्याप कोणताही जैव कचरा प्रकल्प मंजूर नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीला जैव कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने न करता कृष्णा-कोयना नदीच्या पाण्यात केली जात असल्याने पर्यावरण तसेच नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

मे.कराड हॉस्पीटल असोसिएशन व मे. नेअर इन निड, बीएमडब्लूटी सर्व्हिसेस, सातारा या दोन सामाईक जैव वैद्यकीय कचरा भस्मीकरण प्रक्रिया प्रकल्पाकडून कराड (जि. सातारा) तालूक्यातील शहरी व ग्रामीण भागातील हॉस्पिटल मधून निर्माण होणारा जैव वैद्यकीय कचरा गोळा करुन त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येते. तसेच, मे.कृष्णा चॉरिटेबल ट्रस्ट, कृष्णा इन्स्टीटयूट ऑफ मेडीकल सायन्स व डिम युनिर्व्हसिटी, कृष्णा हॉस्पीटल संशोधन केंद्र, कराड, ता.कराड, जि.सातारा या खाजगी हॉस्पीटलकडे त्यांचा वैयक्तीक जैव वैद्यकीय कचरा भस्मीकरण प्रक्रिया प्रकल्प अस्तित्वात आहे

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील राज्याच्या पदकप्राप्त खेळाडूंना रोख पारीतोषिके वितरित करण्यास होत असलेला विलंब

**(१९) * ८९८६६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केरळ येथे सन २०१५ मध्ये झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतील राज्याच्या खो-खो संघातील शिवछत्रपती पूरस्कार विजेत्या खेळाडूंसह राज्यातील १२ खेळाडूंचा समावेश असलेल्या सुवर्णपदक विजेत्या संघाच्या बक्षीसार्थीचे ७ लाख रुपये अद्यापही त्यांना देण्यात आले नाहीत तसेच राज्यासाठी राष्ट्रीय स्पर्धामध्ये सुवर्णपदक पटकावणाऱ्या राज्यातील १२३ खेळाडूंचे ५ कोटी २० लक्ष रुपये सुध्दा अद्यापही त्यांना देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्याच्या या क्रीडा धोरणाला नाराज झालेल्या ३० पेक्षा अधिक खेळाडूंनी महाराष्ट्र राज्य सोडून कर्नाटक, पंजाब व हरियाणा राज्याच्या संघात आपला समावेश करावा, असे प्रयत्न सुरु केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑलम्पिक संघटनेने खेळाडूंच्या प्रलंबित असलेल्या पारितोषिकाची रक्कम मिळण्याबाबत शासनाला सुमारे ९ स्मरणपत्रे पाठविली असून राज्याच्या मा. अर्थमंत्र्यांची भेट घेऊनसुध्दा त्यांच्या पारितोषिकाची रक्कम अद्यापही त्यांना देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेतील राज्याच्या पदकप्राप्त खेळाडूंना द्यावयाच्या रोख पारितोषिकांच्या विचाराधीन असलेल्या सुधारित प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) असल्यास, अद्याप पारितोषिकाची रक्कम न देण्याची कारणे काय आहेत, तसेच खेळाडूंची थकीत असलेली रक्कम देण्याबाबत व राज्यातील खेळाडू परराज्यात जाऊ नयेत याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) वित्त विभागाच्या मान्यतेनंतर तात्काळ खेळाडूंची थकीत असलेली रक्कम देण्यात येईल.

-----------------

## राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षक भरती केंद्रीय पध्दतीने परिक्षा घेऊन करण्याबाबत

**(२०) * ८५२१४ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजित पवार (बारामती), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित व अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांमधील शिक्षक भरती केंद्रीय पध्दतीने अभियोग्यता चाचणी (ॲप्टिटयूड टेस्ट) घेऊन मेरिटवरच करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक भरतीसाठी केंद्रीय पध्दतीने अभियोग्यता चाचणी घेण्याची कारणे काय आहेत, तसेच सदरचा निर्णय विनाअनुदानित शाळांना लागू होणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यातील खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित व अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांमधील शिक्षक भरती अभियोग्यता चाचणीतील गुणांच्या आधारे होण्याबाबतचा निर्णय दि.२३/६/२०१७ रोजी घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे.

(२) शिक्षक भरती प्रक्रियेत सर्व उमेदवारांना निवडीची समान संधी मिळावी, उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड होण्यासाठी तसेच भरती प्रक्रीया पारदर्शकपणे होण्याकरिता अभियोग्यता चाचणी घेण्याचा निर्णय घेण्यात आला. सदरचा निर्णय विनाअनुदानित शाळांना लागू नाही.

(३) प्रथम अभियोग्यता चाचणी सहा महिन्याच्या आत घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

तिचे स्वरुप थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :-

• शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असलेला उमेदवार इयत्ता पहिली ते आठवीकरिता अभियोग्यता चाचणी देण्यासाठी पात्र असेल.

• शाळा व्यवस्थापन त्यांच्या शाळेतील शिक्षकाची / शिक्षण सेवकाची रिक्त पदे भरण्याकरिता बिंदू नामावलीसह विषयांच्या तपशीलानुसार, शासनाने किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अभिकरणाने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीवर किमान १५ दिवसांकरिता जाहिरात प्रसिध्द करेल.

• सदर जाहिरातीस अनुसरुन इच्छूक उमेदवारास त्यास अभियोग्यता चाचणीत मिळालेल्या गुणांसह ऑनलाईन प्रक्रीयेमार्फत अर्ज करता येईल.

• जाहिरातीत नमूद केलेली मुदत संपल्यानंतर शाळा समिती कामकाजाच्या पाच दिवसांमध्ये गुणवत्ता यादी प्रसिध्द करेल व गुणवत्ता यादीनुसार उमेदवाराची निवड करुन नियुक्ती देण्याची कार्यवाही करेल.

• प्रत्येक उमेदवारास सेवाप्रवेश वयोमर्यादेत ५ वेळा चाचणी देण्याची मुभा असेल. या चाचण्यांमध्ये मिळालेल्या अधिकाधिक गुणाच्या आधारावर नियुक्तीस पात्र असेल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील अनेक खाजगी शाळांनी केलेली शुल्क वाढ

**(२१) * ८४९४९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील युनिव्हर्सल, ठाकूर इंटरनॅशनल, लोखंडवाला, सेंटॲन्स, सिस्टर निवेदिता व गरोडिया इत्यादी विविध १० शाळांनी वाढविलेल्या फी वाढीच्या निषेधार्थ विद्यार्थी व पालकांनी शासनाच्या शिक्षण विभागाकडे वारंवार तक्रारी करुन शाळा व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करावी अशी मागणी केली असून सदर तक्रारींच्या अनुषंगाने शिक्षण संचालक, उपसंचालक व शिक्षण विभागाने अद्याप कोणतीच कारवाई न केल्याने मुंबईसह नवी मुंबई व ठाणे परिसरातील

शासनाच्या व फी वाढ करणा-या शाळा व्यवस्थापनांच्या निषेधार्थ दिनांक २० एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलनही करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील दादर (पूर्व) येथील राजे शिवाजी विद्यालय, इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १५ टक्के फी वाढ करण्याचा आदेश तसेच फी शुल्क नियंत्रण अधिनियमानुसार तीन वर्षातून एकदा फी वाढ करण्याची तरतुद असतानाही संस्थेने उल्लंघन करुन इयत्ता १ ली ते ४ थी या प्राथमिक शाळेत १००% तसेच ५ वी ते १० वी माध्यमिक शाळेत सन २०१०-११ ते २०१५-१०१६ या चार वर्षात सलग फी वाढ केली असल्याचे तसेच महर्षी कर्वे शिक्षण संस्थेची महिलाश्रम शाळा आणि ज्युनियर कॉलेजने ५ वी ते ७ वी विना अनुदानित वर्गांसाठी ९६ टक्के, ८ वी ते १० वी विना अनुदानित वर्गासाठी ८१ टक्के, तर ५ वी ते १० वी अनुदानित वर्गासाठी २६ टक्के एवढी फी वाढ घेणारच असा पवित्रा घेतला असल्याचे ही खरे आहे काय

(३) तसेच राज्य शासनाने प्रवेश शुल्क नियंत्रण समिती बरखास्त करुन खाजगी शाळांना प्रवेश शुल्क ठरविण्याची स्वायतत्ता दिल्यामुळे कोल्हापूर जिल्हयातील इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळाही दरवर्षी जवळपास २० टक्क्यांनी शुल्क वाढ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी संस्थांच्या नफेखोरीला आळा घालण्याबाबत राज्य सरकारने दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन अधिनियम, २०११ हा कायदा सर्वत्र लागू केला असून सदर कायद्याची अंमलबजावणी सुरु होण्यापूर्वीच शुल्कवाढीबाबत पालकांकडून असंख्य तक्रारी प्राप्त झाल्याने राज्य सरकारने दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी व्ही.जी.पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय शुल्क नियामक व पुनरीक्षण समिती नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार फी वाढीवर अंकुश घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) मुंबईतील युनिव्हर्सल, ठाकूर इंटरनॅशनल, लोखंडवाला, सेंटअॅन्स, सिस्टर निवेदिता व गरोडिया इत्यादी विविध शाळांनी केलेल्या फी वाढीसंदर्भात पालकांनी तक्रारी केल्या आहेत.

(२) राजे शिवाजी विदयालय, महर्षि कर्वे संस्थेची महिलाश्रम शाळा व ज्युनिअर कॉलेज यांनी फी वाढ केली आहे हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन अधिनियम २०११ मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात शिफारस करण्यासाठी पुनरीक्षण समितीचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती श्री. व्ही.जी.पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

-----------------

**बुलढाणा जिल्हा परिषदेच्या २१३ शाळेतील विद्यार्थ्यांचे पोषण आहाराचा निधी थकीत असल्याबाबत**

**(२२) * ८७८९६ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषदेच्या (ता.मेहकर, जि.बुलढाणा) २१३ शाळेतील विद्यार्थ्यांचे पोषण आहाराचे गत नऊ महिन्यापासून १ कोटी ४३ लाख ३९ हजार रुपये थकीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर येथील वृध्द लोककलावंतांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(२३) * ८९१०६ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील ८७१ वृध्द लोककलावंतांना गत सहा महिन्यांपासून रु.१५०० देण्यात येणारे मानधन मिळाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वृध्द लोककलावंतांच्या मानधनात दुप्पट वाढ करुन ते रु.३,००० करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृध्द लोककलावंताच्या मानधनात वाढ करुन प्रत्येक महिन्याचे मानधन वेळेवर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाघोली (ता. हवेली, जि.पुणे) येथील शिधावाटपाच्या गव्हाची काळ्या बाजारात होत असलेली विक्री**

**(२४) * ८८४६१ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथील शिधावाटपाचा २०० पोती गहू काळया बाजारात विक्रीसाठी नेत असताना पोलीसांनी पकडला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) तहसिलदार, हवेली यांनी गुन्हेगारांविरुध्द दि.१२.०४.२०१७ रोजी लोणीकंद पोलीस स्टेशन यांचेकडे गु.र.नं २४८/२०१७, भा.द.वि. कलम ४६८ व जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३ व ७ नुसार कायदेशीर फिर्याद दाखल केली आहे. तसेच जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबत जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ कलम ६ ब नुसार जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील बडापोखरण नळपाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीबाबत

**(२५) * ९१५६२ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील पश्चिम किनारपट्टीवरील २९ गावे व चार वाडयांना बडापोखरण नळपाणी योजनेतून पाणीपुरवठा होत असून सदर योजनेतील जुनाट नादुरुस्त जलवाहिन्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्याचे तसेच कालबाह्य झालेल्या उक्त योजनेच्या नुतनीकरणासाठी शासनाने ४३ कोटी रुपयांचा निधी दहा वर्षापूर्वी मंजूर करुनही अद्यापही उक्त योजनेचे काम अपूर्ण असल्याचे दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील जलवाहिन्या जुन्या असल्याने व काही तांत्रिक अडचणींमुळे गावांना पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने तेथील गावकऱ्यांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषगांने उक्त काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसचे उक्त कामास विलंब करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

रु.४३.२८ कोटी ढोबळ किंमतीच्या बडा पोखरण पाणी पुरवठा योजनेस दिनांक १४.११.२०१३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून, दिनांक ५.३.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आले आहे. योजनेतील समाविष्ट ३३ गावांपैकी २९ गावांना चाचणी स्वरुपात पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

पश्चिम भागातील नव्याने टाकण्यात आलेली मुख्य जलवाहिनी टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करुन मे २०१६ पासून अस्तित्वातील व नवीन वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून सुरळीत पाणी पुरवठा सुरु केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**न्याहाळे ब्रुद्रक (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील चार पाडयांना पाणी पुरवठा करणेबाबत**

**(२६) * ८६८८१ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्याहाळे ब्रुद्रक (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील चार पाडयांना पिण्याच्या पाण्याची भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असुन या चार पाडयांच्या ग्रामस्थांनी टँकरची मागणी जव्हार पंचायत समितीकडे करुनही टँकर मिळत नसल्याचे दिनांक २४ एप्रिल,२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या महिलांना पाण्यासाठी पहाटेपासून नदी, नाले, कोरडया विहिरींवर वणवण भटकावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व असल्यास, उक्त ठिकाणी कायमस्वरूपी पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली व प्रश्न भाग (१) मधील मागणीकडे दूर्लक्ष करणाऱ्या संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) न्याहाळे बुद्रुक (ता. जव्हार, जि. पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील खालील चार टंचाईग्रस्त पाडयांमध्ये कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना घेण्यात आल्या आहेत.

अ) न्याहाळे (बु.) काष्टीचा पाडा या पाडयात पूर्वीच्या दोन विहीरी असुन सन २०१४-१५ या वर्षात ठक्कर बाप्पा योजने अंतर्गत साधी विहिरही पूर्ण करण्यात आली आहे.

ब) न्याहाळे (बु.) मोरगिळा या पाडयात पुर्वीच्या दोन साध्या विहीरी असून सन २०१६-१७ अंर्तगत ठक्कर बाप्पा आदिवासी उपाय योजनेतुन साधी विहिर नव्याने मंजुर करण्यात आली आहे. तसेच या पाडयात N.G.O मार्फत साठवण तलावाचे काम हाती घेण्यात आले आहे.

क) न्याहाळे (बु.) शिवा कोरडयाची मेट या पाडयात पुर्वीच्या दोन साध्या विहिरी व दोन बुडकी (लहान विहिर) अस्तिवात आहेत.

ड) न्याहाळे (बु.) मोगरावाडी या पाडयात पुर्वीच्या दोन विहीरी अस्तीत्वात असून पाडया जवळून खडखड धरणाचा कालवा गेला आहे. सदर कालव्याचे दुरुस्तीचे काम चालु असल्यामुळे केवळ यावर्षी सदर पाडयात टॅंकरची आवश्यकता भासली आहे.

अशा प्रकारे संबंधित पाडयांमध्ये पाणीपुरवठाच्या वरीलप्रमाणे कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. टॅंकरच्या मागणीकडे दुर्लक्ष झालेले नसल्याने कोणावरही कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आगाशी कुंभारवाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील शिधावाटप दुकानातील रॉकेलची काळ्या बाजारात होत असलेली विक्री**

**(२७) * ८५९३६ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगाशी कुंभारवाडा (ता.वसई,जि.पालघर) येथील एका शिधावाटप दुकानात ५ हजार लिटर निळे रॉकेलची काळयाबाजारात विक्री करत असताना जन आंदोलन समितीच्या कार्यकर्त्यांनी दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास रंगेहात पकडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुकानात दिलेल्या कोटयापेक्षा जास्त रॉकेलचा साठा असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रॉकेल पुरवठा विभागाच्या मदतीने वसई गोदामामधून उपलब्ध होऊन त्यासाठी दरमहा पुरवठा अधिका-यांना १० हजारांचा हप्ता देत असल्याची उक्त दुकानदाराने माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) मौजे आगाशी कुंभारवाडा, ता.वसई, जि.पालघर येथील किरकोळ केरोसिन परवानाधारकाविरुध्द दि.१२.६.२०१७ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पुरवठा निरिक्षक, वसई यांनी तपासणी केली असता साठा रजिस्टरवर दर्शविण्यात आलेल्या शिल्लक साठ्यापेक्षा ८० लिटर केरोसिन जास्त असल्याचे आढळून आले.

(३) अशा स्वरुपाची कोणतीही माहिती उक्त परवानाधारकाने दिलेली नाही.

(४) केरोसिन परवान्याची तपासणी केली असता तपासणीत गंभीर दोष आढळून आल्याने परवानाधारकाविरुध्द अर्नाळा पोलिस ठाण्यात गुन्हा रजि.नं.II६/१७, दि.१३.६.२०१७ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील महाड, रोहा, खालापूर, पनवेल, पेण येथील औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांमधून होणारे प्रदूषण

**(२८) * ८८१८८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड)परिसरातील औद्योगिक वसाहतीतील काही कारखान्यांवर महाराष्ट्र नियंत्रण मंडळाने कारवाई करूनसुध्दा संबंधित कारखाने नियमांचे उल्लंघन करून रासायनिक प्रदूषित पाणी टेमघर नाला व सावित्री नदीमध्ये सोडण्यात येत असल्याने नागरीकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असल्याप्रकरणी टेमघर नाला परिसरातील १३ ग्रामपंचायती व लोकप्रतिनिधींनी मा.पर्यावरणमंत्री तसेच प्रदुषण विभागीय अधिकारी व महाड येथील अधिका-यांकडे दिनांक १६ जून, २०१७ रोजी तसेच वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाड औद्योगिक वसाहतीमधील श्रीहरी केमिकल्स या कारखान्याने रासायनिक सांडपाणी थेट नदीपात्रात सोडल्याचा प्रकार माहे जून,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू सांडपाण्यामुळे महाड औद्योगिक वसाहतीमधील निवासी संकुले त्याचप्रमाणे शहराच्या काही भागाला लाल रंगाच्या दुषित पाण्याचा पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उक्त जिल्ह्यातील महाड, रोहा, खालापूर, पनवेल, पेण या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रासायनिक कंपन्या कार्यरत असून पर्यावरण विभागाने रासायनिक कंपन्यानी प्रदूषित सांडपाणी प्रक्रिया करून सोडण्याबाबत दिलेल्या सूचनांचे उल्लंघन करून उक्त कंपन्या नदी पात्रात प्रदूषित सांडपाणी सोडत असल्याने परिसरातील शेतीचे व छोट्या मच्छिमारांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व असल्यास, त्यानुसार संबंधित दोषी कंपन्या व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त शेतकऱ्यांचे व छोट्या मच्छिमारांचे होणारे नुकसान याची भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये श्रीहरी कॅमिकल एक्सपोर्ट लिमिटेट, प्लॉट नं - अ/८,अ-१५/१, अ-१५/२, अ-९, एमआयडीसी, महाड या कारखान्यामधुन औद्योगिक सांडपाणी थेट टेमघर नाल्यात मिसळत असल्याचे निर्देशनास आल्याने सदरील कारखान्यास दि. १३/०६/२०१७ रोजी उत्पादन प्रक्रिया बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात निर्माण झालेली पाणी टंचाई

**(२९) * ८६०७७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) येथे व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील १६० गाव-पाडे येथे भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून दूषित पाणी पुरवठा होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी निर्माण झालेल्या पाणीटंचाईमुळे नागरिकांना दररोज १० कि.मी अंतराची पायपीट करावी लागत असून दांडगाव येथील श्री. तुकाराम आगीवले यांचा दिनांक १० एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास आंबळे डोहात पडून मृत्यु झाला तसेच उक्त दोन तालुक्यात पाणी आणण्यासाठी गेलेल्या दोन जणांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, शहापूर तालुक्यातील भीषण पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, मुंब्रा-कळवा यांनी दिनांक १७ मे,२०१७ रोजी तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.पाणीपुरवठा मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे मागण्या केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने तालुक्यातील भीषण पाणीटंचाई लक्षात घेता कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच ग्रामस्थांनी टँकरने पाणी पुरवठा करावा अशी मागणी वारंवार जिल्हा प्रशासनाकडे करूनही टँकरने पाणी पुरवठा न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, मृत्युमुखी पडलेल्या श्री.तुकाराम आगीवले व दोन व्यक्तींच्या कुटूंबियांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे. मोखाडा व शहापूर तालुक्यामध्ये काही गांवे/पाड्यांमध्ये सन २०१६-१७ च्या टंचाई कालावधीत पाणी टंचाई निर्माण झाली होती. तथापि, सदर तालुक्यांमध्ये टंचाई कालावधीत दूषित पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही.

(२) मोखाडा व शहापूर तालुक्यातील नागरिकांना पाणीटंचाई मुळे १० कि.मी. अंतराची पायपीट करावी लागते हे खरे नाही. तथापि, शहापूर तालुक्यातील श्री. तुकाराम आगीवले हे दिनांक ११.०४.२०१७ रोजी आबले डोह येथे गेले असता त्यांचा पाण्यात बुडून मृत्यु झाला आहे. मात्र त्याबाबतची कोणतीही नोंद कसारा पोलीस ठाण्यात करण्यात आलेली नाही.

तसेच मोखाडा तालुक्यातील पोशेरा पैकी पळसपाडा येथील एक महिला पाणी आणण्यासाठी गेली असता तिचा पाण्यात बुडून मृत्यु झाला आहे.

(३) होय.

(४) शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गांवे/पाडयांना कायमस्वरुपी टँकरमुक्त करणेकरीता नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्यातील भावली धरणावरुन गुरुत्वाकर्षणाद्वारे पाणी पुरवठा करणेकरीता ९७ गांवे व २५९ पाडयांकरीता अंदाजे रुपये १७१ कोटीची पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायातीच्या मागणीनुसार वेळेवर टँकर सुरु करण्यात आले आहेत. त्यामुळे कोणावरही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) मोखाडा व शहापूर तालुक्यात झालेले मृत्यू हे आकस्मिक मृत्यू असल्याने त्यांना आर्थिक मदत करण्यात आलेली नाही.

तथापि, मृतांच्या वारसदारांना कशाप्रकारे आर्थिक मदत देता येईल याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून मागविण्यात आला आहे.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील १०८ गावातील पिण्याचे पाणी दुषित असल्याबाबत

**(३०) * ८९०६३ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने माहे मार्च, २०१७ मध्ये केलेल्या जिल्हयातील जलस्त्रोतांची जैविक तपासणीत १०८ गावातील पिण्याचे पाणी दुषित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतींनी पाणी शुध्दीकरणाच्या कामासाठी नियुक्त केलेल्या जलरक्षकांकडून कामात दुर्लक्ष केल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत असल्याचे तपासणीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व या गावांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.
अहमदनगर जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्या मार्फत कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी,जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा अहमदनगर व वरिष्ठ वैज्ञानिक भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, अहमदनगर यांच्याकडून माहे,मार्च २०१७ मध्ये १७२५ पाणी नमुने तपासण्यात आले .त्यापैकी १०४ गावांतील १५२ पाणी नमुने दुषित आढळून आले त्यांची टक्केवारी ८.८१ इतकी आहे.
(२), (३) व (४) दुषित आलेल्या स्त्रोतांवर ग्रामपंचायतीकडून योग्य ती उपाय योजना करण्यात आली आहे. तसेच गटविकास अधिकारी, यांचेकडून ६८ ग्रामसेवकांना नोटीशीद्वारे समज देण्यात आलेली आहे व ३६ जलसुरक्षकांना नोटीस देण्यात येवून समज देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## लोटे (ता.खेड, जि. रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांचे घातक रासायनिक सांडपाणी दाभोळ खाडी पात्रात सोडण्यात येत असल्याबाबत

**(३१) * ८५२८४ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांचे घातक रासायनिक सांडपाणी दाभोळ खाडी पात्रात सोडण्यात आल्याने मोठ्या प्रमाणात मासे मृत झाल्याचे तसेच परिसरात दुर्गंधी पसरल्याचे दिनांक १३ ते १७ जून २०१७ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मासे मृत होण्याच्या घटनेची मच्छिमार बांधवानी माहिती देऊनही प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिका-यांनी दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत ३ वर्षांपासून सातत्याने असे प्रकार घडत असल्याने खाडीतील माशांच्या अनेक जाती नष्ट झाल्या आहेत. त्यामुळे मासेमारी करून उदरनिर्वाह करणा-या खाडी किनारील ८६ गावांतील हजारो मच्छिमार कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,संकटात सापडलेल्या मच्छिमारांना दिलासा देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याबाबत तसेच सदर प्रकरणी दखल न घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) भिले भोईवाडी, करंबवणे येथील खाडीमध्ये मासे मर्तुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी भिले, करंबवणे खाडी येथे दि.१८.०६.२०१७ रोजी पाहणी केली असून खाडीतील पाण्याचे तसेच मृत माशाचे नमुने पृथकरणासाठी दि. १९.०६.२०१७ रोजी प्रादेशिक न्यायवैधक प्रयोगशाळा, पुणे येथे पाठविण्यात आले आहेत. तसेच सदरील घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने लोटे परशुराम औदयोगिक वसाहतीमधील उदयोगांची व सीईटीपीच्या केलेल्या पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या पाच उदयोगांना उत्पादन बंदचे आदेश, ३१ उदयोगांना प्रस्तावित आदेश व २३ उदयोगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) दाभोळ खाडीतील जलप्रदूषणामुळे निर्माण झालेल्या मासे मर्तुकीच्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच भोई समाजाच्या उन्नतीसाठी लोटे परशुराम इंडस्ट्रियल असोसिएशन व लोटे परशुराम एन्हॉ.प्रोटेक्शन को.ऑप.सोसायटी लोटे यांनी संयुक्तपणे पुढील ३ वर्षासाठी सर्व समावेशक असे रु. २५.० लाखाची आर्थिक मदत देण्याचे मान्य केले असून दाभोळ खाडी संघर्ष समितीस आतापर्यंत रु. २१.० लाख मदत देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोहा (जि.नांदेड) येथील शासकीय धान्य गोदामात धान्याचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३२) * ८९०१६ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) येथील तहसिल कार्यालयाची व शासकीय धान्य गोदामाची बीड येथील पथकाने माहे एप्रिल २०१७ पाहणी केली असता सुमारे ८३ लाख रुपयांचा धान्याचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आहे व त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) लोहा (जि.नांदेड) येथील तहसिल कार्यालयाची व शासकीय धान्य गोदामाची जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी नियुक्त केलेल्या पथकाने माहे एप्रिल २०१७ मध्ये तपासणी केली होती.सदर तपासणी अहवालात रास्तभाव दुकानदारांनी नियतनापेक्षा जास्त धान्य उचल केल्याचे निदर्शनास आल्यामुळे जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दि.१६.०१.२०१७ अन्वये रु.८२,९६,७११.३६/- वसुल करण्याचे आदेश दिले असल्याचे नमूद केले आहे. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अहवालानुसार याप्रकरणी रु.७२,७९,२१७/- एवढया रक्कमेची वसुली झालेली आहे व उर्वरित रक्कम रु.१०,१७,४९४.३६/- वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) सदर प्रकरणात ता.लोहा जि.नांदेड येथील १.श्री.एन.जी.झंपलवाड, तत्का.तहसिलदार, लोहा २.श्री.आर.जी.तूपकर, नायब तहसिलदार (सेवानिवृत्त) ता.लोहा ३.श्री.जी.पी.नागरगोजे, नायब तहसिलदार, लोहा ४. श्री.आर.एन . पाठक, नायब तहसिलदार, लोहा ५.श्री.पी.पी.बडवणे, अव्वल कारकुन, तहसिल कार्यालय, लोहा ६.श्री.जी.एल.मोहिजे, अव्वल कारकुन, लोहा ७. श्री.सी.पी.धर्मेकर,

गोदामपाल, लोहा जि.नांदेड या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ व नियम १२ नुसार संयुक्त विभागीय चौकशीचा प्रस्ताव दोषारोपपत्र एक ते चार तयार करुन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरुड-जंजीरा (जि. रायगड) येथील मुरुड समुद्र किनारी रसायन मिश्रीत तेलाचा तवंग पसरल्याने कासव व मासे मृत झाल्याबाबत

**(३३) * ८५२२१ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड-जंजीरा (जि. रायगड) येथील मुरुड समुद्र किनारी रसायन मिश्रीत तेलाचा तवंग पसरल्याने समुद्रातील कासव व मासे मोठया प्रमाणात मृत झाल्याचे दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले व रसायन मिश्रीत तेलाचा तवंग पसरण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास एक मृत व कूजलेल्या अवस्थेतील कासव समुद्रातून वाहून किनाऱ्यावर आला होता. याबाबतची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने दि. १३/०७/२०१७ रोजी मुरुड नगरपालिकेचे प्रतिनिधी, स्थानिक रहिवासी यांच्या सोबत केलेल्या पाहणी दरम्यान निर्दशनास आली होती.

(३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मुरुड तालुक्यातील मुरुड, काशीद व साळाव येथील समुद्राच्या पाण्याच्या गुणवत्तेची दर महा नियमितपणे तपासणी करण्यात येत असून सदर पाण्याच्या पृथ्थकरण अहवालानूसार येथील समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता सर्वसाधारणत: विहित मर्यादेत असल्याचे आढळून आले आहे.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वास्तुकला अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका वितरीत केल्याबाबत

**(३४) * ८५५९५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील वास्तुकला अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ४० गुणांची चुकीची प्रश्नपत्रिका वितरीत केल्याची बाब माहे मे २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दिवशी घडलेल्या प्रकाराबद्दल परीक्षा विभाग प्रमुख अनभिज्ञ असल्याने त्यांच्या असहकार्यामुळे आणि वितरीत केलेल्या चुकीच्या प्रश्नपत्रिकेमुळे विद्यार्थ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालयांना चुकीचे प्रश्नपत्रिका वितरीत करण्याचे प्रकार परीक्षा विभागाकडून वारंवार घडत असतांना संबंधित प्रकरणी आणि दोषी आढळणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्राश्निकाकडून येणाऱ्या प्रश्नपत्रिका गोपनीयतेच्या दृष्टीने पासवर्ड लावून येत असल्याने महाविद्यालयाकडून याबाबत आक्षेप अथवा शंका घेतल्यानंतर ही बाब विद्यापीठाच्या निदर्शनास येते.

दिनांक २६/०४/२०१७ रोजी वास्तूकला अभ्यासक्रमाच्या परिक्षेच्या दरम्यान प्रश्नपत्रिका ऑनलाईन वितरीत केल्यानंतर ११.१५ चे दरम्यान परीक्षा केंद्रावरुन काही प्रश्न अभ्यासक्रमाच्या बाहेरील असल्याची माहिती प्राप्त झाली. तद्नंतर ११.२० वाजता सर्व परीक्षा केंद्रांना सुधारीत प्रश्न पाठविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. तसेच प्रश्नपत्रिका तयार करुन देणाऱ्या प्राश्निक समितीच्या अध्यक्षांशी संपर्क साधला असता त्यांनी ११.३७ वाजता सुधारीत प्रश्न पाठविले. सर्व परीक्षा केंद्राना ११.४५ वाजता नव्याने प्रश्न वितरीत करुन विद्यार्थ्यांना त्या प्रमाणात अधीकचा वेळ देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयातील पेयजल योजना निधीअभावी अपूर्ण असल्याबाबत**

**(३५) * ८४८३९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राजन साळवी (राजापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील वाड्या, वस्त्यांमध्यील पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने सन २०१६-१७ ते २०१९-२० या ४ चार वर्षाच्या कालावधीसाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना राबविण्याचे ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यासह राज्यात पाणी टंचाईची समस्या असताना पेयजल योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मिळणा-या ८०० कोटी रुपयांच्या निधीमध्ये केंद्र शासनाने कपात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनांमध्ये सामाविष्ट करण्यात आलेल्या ३२ कोटीच्या योजनांमध्ये १६ कोटी रुपयांचा असलेला सहभाग केंद्र शासनाने न दिल्यामुळे तसेच राज्य शासनानेही आपला निधी न दिल्यामुळे रत्नागिरी जिल्हयातील पावनेदोनशेच्यावर पेयजल योजना राबविण्यात आल्या नसून यापैकी हाती घेण्यात आलेल्या ४७ योजनांपैकी केवळ ३१ योजना पूर्ण झाल्या असून १३८

योजना राबविण्यात आल्या नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे तसेच ५२३ योजना पूर्ण झाल्या आहेत परंतु कागदोपत्री अपूर्ण असल्याने व नव्या योजनांना निधी उपलब्ध होत नसल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पयेजल योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील किती तालुक्यांमधील गांवे, वस्त्या व वाड्या यांचा समावेश करण्यात आला आहे, एकूण किती निधीची तरतूद करण्यात आली व किती योजना सुरु करण्यात आल्या आहेत आहे,

(५) असल्यास, शासनाने राज्यातील दुष्काळी भागात जास्तीत जास्त निधी मिळवून देण्याबाबत तसेच सदरहू योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा राज्य शासनाचा सर्वसमावेशक कार्यक्रम असून यासाठी राज्य शासनाकडून १०० % निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

तथापि, सन २०१५-१६ पासून केंद्रशासनाने १४ व्या वित्त आयोगांतर्गत राज्यास वाढीव निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या तरतुदीमध्ये कपात केली आहे. या अनुषंगाने केंद्र शासनाने १४ व्या वित्त आयोगांतर्गत उपलबध करुन दिलेला निधी प्राधान्याने ग्रामीण पाणी पेयजल सुविधांसाठी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

(३) अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सन २०१६-१७ च्या आराखड्यात १६८ वाड्यांच्या ९४ योजनांचा समावेश होता. त्यापैकी १४० वाड्यांच्या ७९ योजना प्रगतीपथावर होत्या. त्यापैकी माहे मार्च, २०१७ अखेर ४६ वाड्यांच्या २४ योजनांचा पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. उर्वरित ५५ योजनांपैकी ५० योजनांचा समावेश सन २०१७-१८ च्या आराखड्यामध्ये करण्यात आला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील ५२३ योजना भौतिक दृष्ट्या पूर्ण परंतु अर्थिकदृष्ट्या अपूर्ण आहेत. या योजनांपैकी माहे जून २०१७ अखेर ३२ योजना भौतिक व आर्थिकदृष्ट्या पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित ४९१ योजना आर्थिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने जिल्हा व तालुका स्तरीय समिती स्थापन करुन नियोजन केले आहे.

(४) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ५२७ वाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी सन २०१६-१७च्या आराखड्यातील ८९ वाड्यांच्या ५० योजना प्रगतीपथावर आहेत. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेत नव्या योजना हाती घेऊ नये, असे केंद्र शासनाचे आदेश असल्याने नवीन योजनांची कामे हाती घेण्यात आलेली नाहीत.

मात्र मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमामध्ये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये, रत्नागिरी, चिपळून, संगमेश्वर, गुहागर, व खेड या ५ तालुक्यामधील एकूण ११ नळ पाणी पुरवठा योजनांचा समावेश केला असून, त्याकरीता रु.४५०२.८५ लक्ष ची तरतूद केली आहे.

त्यापैकी मौ. पोमेंडी (बु.), ता.जि. रत्नागिरी व मौ. खानू मावळंकरवाडी, ता.जि. रत्नागिरी या दोन योजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

(५) शासनाने राज्यामध्ये पेयजल योजना राबविण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

राज्याने सर्वसमावेशक असा राज्य शासनाचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत नवीन पाणी पुरवठा योजना राबविणे, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करणे, प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी देखभाल दुरुस्ती इ. बाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा केंद्र निधी व सम प्रमाणात राज्य हिश्श्यांतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतील निधी, २५% पेक्षा जास्त प्रगती असलेल्या योजना, फ्लोराईड बाधित, संसद आदर्श ग्राम योजना व हागणदारीमुक्त असलेल्या गावे/वाड्यांच्या नवीन योजनांसाठी उपलब्ध करण्याबाबत सर्व जिल्ह्यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच इतर वर्गवारीतील प्रगतीपथावरील व प्रस्तावित योजनांसाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून सदर योजना पूर्ण करावयाच्या आहेत.

----------------

**रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरुस्ती करणेबाबत**

**(३६) * ८६०५९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील कलंब, वारे, खांडस, ताडवाडी, वंजारपाडा, देवपाडा या जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांची दुरावस्था झाली असून गळती छते, तुटलेल्या भिंती, संरक्षक भिंतीचा अभाव व अस्वच्छ परिसरात विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील शाळांची दुरूस्ती करावी अशी पालकांनी वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून कोणतीच दखल घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण देण्यासंदर्भात तसेच शाळांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील कलंब, वारे, ताडवाडी जिल्हा परिषदेच्या शाळांची डागडूजी केली असून इमारती सुस्थितीत आहेत. खांडस येथील इमारत धोकादायक झाल्याने विद्यार्थ्यांची अन्य २ इमारतींमध्ये सोय केली आहे. वंजारपाडा शाळेच्या ३ वर्गखोल्यांच्या बांधकामाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच देवपाडा येथील इमारतीच्या स्लॅबवर ताडपत्री आच्छादन घालण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या ऑनलाईन औषध विक्रीवर निर्बंध आणण्याबाबत

**(३७) * ८६७७४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या ऑनलाईन औषधे विक्रीमुळे अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेमार्फत दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास औषध दुकानांचा बंद पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन फार्मसीच्या माध्यमातून बेकायदेशीरपणे नार्कोटीक्स, ड्रग्ज, झोपेची औषधे, गर्भपाताच्या गोळया व गर्भलिंग निदानाचे परीक्षण साहित्य या सारख्या अनेक धोकादायक औषधांची विक्री सुरू असल्याचे शासनाच्या वारंवार निदर्शनास आणूनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार उक्त ई-फार्मसीच्या माध्यमातून होणाऱ्या औषधांच्या विक्रीवर निर्बंध आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) केंद्र शासनाने दि. १६ मार्च, २०१७ रोजी औषध विक्रीबाबतचे प्रस्तावित धोरण प्रसिध्द करून हरकती व सूचना मागविलेल्या आहेत. या केंद्र शासनाच्या औषध विक्रीबाबतच्या प्रस्तावित धोरणातील तरतूदी विरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेमार्फत दि. ३० मे, २०१७ रोजी बंद पुकारण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

(३) अन्न व औषध प्रशासनाव्दारे सन २०१६ पासून ऑनलाईन औषध विक्रीच्या प्रकरणी खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

०७ प्रकरणी प्रथम खबर अहवाल दाखल

१३ प्रकरणी पेढीचा परवाना रद्द

०६ प्रकरणी पेढीचे परवाने निलंबित

०१ प्रकरणी खटला दाखल

०५ प्रकरणी परराज्यातून औषध पुरवठा झाल्याने संबंधित राज्य औषध नियंत्रकांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**आंबोली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) क्षेत्रात येणा-या १३ वाड्यांसाठी असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३८) * ८६०७१ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबोली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) क्षेत्रात येणा-या १३ वाड्यांसाठी असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या निकृष्ट कामामुळे माहे एप्रिल, मे आणि जून या महिन्यात तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागल्याची तक्रार तेथील ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी यांच्याकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणा-या ठेकेदारांवर व संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, उक्त ठिकाणी पाणी टंचाईवर मात करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
आंबोली गावात पाणी टंचाई असलेबाबत तक्रार/निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) प्रश्न उद्‍भवत नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठ संलग्नित अनेक नामांकित महाविद्यालयांनी विविध अभ्यासक्रमांची मान्यता फी भरली नसल्याबाबत

**(३९) * ८४९५० अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांची संख्या ७५० हून अधिक असून अनेक नामांकित महाविद्यालयांनी गत ५ वर्षापासून महाविद्यालय व विविध अभ्यासक्रमांची मान्यता फीच भरली नसल्याचे तसेच काही महाविद्यालयांना नॅकचे ए मुल्यांकन देखील मिळालेले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महाविद्यालयांत अभ्यासक्रमांची मान्यता नसतानाही अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालय व अभ्यासक्रम मान्यता फी न भरणारी महाविद्यालयांची संख्या किती आहे व त्यांची नावे काय आहेत तसेच फी भरेपर्यंत उक्त अभ्यासक्रमांची मान्यता रद्द करणार आहे काय,

(४) असल्यास, अशा महाविद्यालयांकडून अभ्यासक्रम मान्यता फी वसूल करण्यासाठी तसेच सदर अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेवगाव व पाथर्डी (जि. अहमदनगर) तालुक्यातील ४८ गावांना पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी नादुरुस्त असल्याबाबत

**(४०) * ८५९४१ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवगाव व पाथर्डी (जि. अहमदनगर) तालुक्यातील ४८ गावांना जीवनदायी योजनेतून पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी ठिकठिकाणी फुटल्यामुळे दररोज लाखो लीटर पाणी वाया जात असून नागरिकांना गढूळ पाणी मिळत असल्याचे दिनांक २८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजना सुरळीत सुरु होण्याबाबत व नागरिकांना स्वच्छ पाणी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सत्वर दुरूस्ती करून वेळोवळी पाणी नमुने घेण्यात आले. सदर पाणी नमुन्यांची रासायनिक व जैविक तपासणी करण्यात येते. तसेच जलशुध्दीकरण केंद्रावर दैनंदिन तुरटी व ब्लीचिंग पावडरचा योग्य प्रमाणात वापर करून शुध्दीकरण करण्यात येते.सत्वर दुरूस्ती करून स्वच्छ व शुध्द पाणी पुरवठा केल्यामुळे कारवाईचा प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व विद्यापीठामध्ये प्राध्यापकांच्या दोन हजाराहून अधिक जागा रिक्त असल्याबाबत

**(४१) * ८९०९५ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील सर्व राज्यातील विद्यापीठे वा त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांना केंद्र शासनाने उच्च शिक्षण संशोधन विकास आणि पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियान सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सन २०१६-१७ या वर्षासाठी २७२ कोटीचा आराखडा सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधी मिळण्याकरिता विद्यापीठामध्ये रिक्त जागा नसाव्यात ही अट घालण्यात आली असून  राज्यातील सर्व विद्यापीठामध्ये सुमारे दोन हजाराहून अधिक प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्याची बाब प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिनांक २५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या विद्यापीठांच्या कुलसचिवांच्या बैठकीत निदर्शनास आणली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राध्यापकांच्या रिक्त जागांमुळे, केंद्र शासनाने यावर्षीचा १०० कोटी रुपयांचा निधी अद्याप दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्या अनुषंगाने प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच उक्त जागा रिक्त ठेवणाऱ्या विद्यापीठांवर कोणती कारवाई केली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) रुसा योजनेसाठी केंद्र शासनाने १२ व्या पंचवार्षिक योतनेतंर्गत रुपये २७१ कोटी रकमेचा प्रकल्प आराखडा मंजूर केलेला आहे.

(३) अंशत: खरे अहे.

रुसा योजनेतंर्गत निधी प्राप्त करुन देण्यासाठी विविध निकष असून त्यापैकी विद्यापीठाने रिक्त जागा भरणे हा एक निकष आहे.

या संदर्भात दिनांक २५/०५/२०१७ च्या बैठकीत अप्पर मुख्य सचिव (प्रभारी) यांनी अकृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(४) मार्च २०१७ अखेर केंद्र व राज्य शासनाचा निधी धरुन रुपये ६८.७० कोटी निधी रुसाला प्राप्त झाला आहे. तसेच जून २०१७ मध्ये रुपये ३९.०० कोटी एवढा निधी मंजूर केला आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

सर्व अकृषी विद्यापीठे आणि शासनमान्य अभिमत विद्यापीठातील एकूण ४८४ शिक्षकीय पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांचेकडून दिनांक ०१/०६/२०१७ रोजी शासनास प्राप्त झाला आहे.

-----------------

## लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औदयोगिक वसाहतीमधील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या क्षमतावाढीच्या कामात होत असलेला गैरव्यवहार

**(४२) * ८५३३४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औदयोगिक वसाहतीमध्ये असलेल्या सामुहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या क्षमतावाढीचे ३२ कोटी रुपये खर्चाचे सुरु असलेले काम नियमानुसार होत नसून त्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) सदर प्रकल्पास राज्यस्तरीय पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरणाने (SEIAA) दि. २७/०६/२०१६ रोजी पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. त्यानूसार प्रकल्पाचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरू आहे. सदर प्रकल्पाचे काम सुरू झाल्यापासून कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, रत्नागिरी विभाग, रत्नागिरी यांनी कळविले आहे

-----------------

## राज्यात शिक्षकांची ३२ हजाराहून अधिक पदे रिक्त असल्याबाबत

**(४३) * ८४८४५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय पुराम (आमगाव), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५-१६ या वर्षा अखेर प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक व मुख्याध्यापकांची ३२ हजार ९४४ पदे रिक्त असल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बुलडाणा जिल्हा परिषदेतील ८५ उच्च श्रेणी मुख्याध्यापक, ५८ उर्दू प्राथमिक शिक्षक, उर्दू माध्यमाच्या सहाय्यक शिक्षकांची ९६ व मराठी माध्यमाची १३४ पदे रिक्त असल्यची बाब माहे एप्रिल २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली असुन उर्दू माध्यमांची पदे उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ता.मंगळवेढा जि.सोलापूर येथे मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षकांसह प्राथमिक शिक्षकांची तब्बल ७७ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे व मुंबईतील ४९, ठाणे जिल्ह्यातील २३६, पालघर १५७ तर रायगड जिल्ह्यातील १६७ शाळा या एक शिक्षकी आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, नियमानुसार राज्यात एकही शाळा एक शिक्षकी ठेवता येत नाही हे खरे आहे काय, त्याचप्रमाणे विषयानुसार शिक्षक नेमणेही आवश्यक असताना या नियमांचे पालन करण्यासाठी शिक्षकांची भरती करण्याऐवजी कमी पटसंख्येच्या शाळांचे समायोजन करण्याची कार्यवाही शिक्षण विभागाकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शाळांचे समायोजनानंतर मंजूर असलेली शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे कमी होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने उक्त प्रक्ररणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार शिक्षक व मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अंशत: खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.